ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन



प्रतिसरकारचे अर्ध्वयू-क्रांतिसिंह नाना पाटील

**१९४२ चे चलेजाव आंदोलन : अमृत महोत्सवी वर्ष**

३२. धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी
प्रा.डॉ.कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव ८८

३३. किल्ले अजिंक्यतारा : एक भौगोलिक व ऐतिहासिक अवलोकन
प्रा.डॉ.अशोक श्रीरंग खाडे ९१

## आधुनिक विभाग

३४. रमाबाई आंबेडकरांनी गृहिणींना दिलेली 'स्वत्वाची जाणीव' –अब्राह्मणी स्त्रीवादाच्या चर्चाविश्वाच्या कंगोऱ्यातून एक चिंतन''
डॉ.गीतांजली भी.बोराडे ९३

३५. राजर्षि शाहू आणि भारतीय प्रश्न
प्रा.डॉ.मंजुश्री जयसिंगराव पवार ९७

३६. १८५७ सातारा परिसरातील हत्यारे, शस्त्रास्त्रे सरकार जमा करण्यासंबधीची अप्रकाशित कागदपत्रे
डॉ.चंद्रकांत जगन्नाथ अभंग ९९

३७. ना.गोपाळ कृष्ण गोखले : व्यक्ति व संस्थापन भारत सेवक समाज
प्रा.श्रुती राजेंद्र भातखंडे १०५

३८. कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीस 'प्रभात फिल्म कंपनी'चे योगदान
प्रा.डॉ.कविता अशोक गगराणी ११०

३९. धरण आणि भुकंप यांचा परस्पर संबंध आहे काय? विशेष अभ्यास कोयना जलविद्युत प्रकल्प
प्रा.डॉ.विश्वनाथ पांडुरंग पवार
सौ.सुषमा देवानंद पवार ११०

४०. क्रांतिसिंह नाना पाटील आणि १९६२ चे भारत चीन युध्द
प्रा.डॉ.सुमित संभाजी यादव ११७

४१. गुरव स्त्रियांचे गावगाड्यातील स्थान
डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे पाचपिंडे ११९

४२. कोहिनूर हिऱ्याचा इतिहास
डॉ.मधुकर विठोबा जाधव १२१

४३. प्रा.डॉ.एन.डी.पाटील रयतचे आधारवड
श्री.चंद्रकांत बाबूराव कुंभार १२५

४४. महात्मा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टिकोन
श्री.राजू जगन्नाथ लोखंडे १२७

४५. पुण्यातील शिवस्मारक आणि तत्कालीन वैचारिक संघर्ष
डॉ.सोपान शेंडे १२९

४६. घिसाडी जमात–स्थानिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून
प्रा.रमेश सोनू झरेकर १३३

४७. भारतीय चित्रपटसृष्टीतील महाराष्ट्र फिल्म कंपनीचे योगदान.
प्रा.हमीद उमरअली काझी १३६

३२. धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी
प्रा.डॉ.कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव ८८

३३. किल्ले अजिंक्यतारा : एक भौगोलिक व ऐतिहासिक अवलोकन
प्रा.डॉ.अशोक श्रीरंग खाडे ९१


## आधुनिक विभाग


३४. रमाबाई आंबेडकरांनी गृहिणींना दिलेली 'स्वत्वाची जाणीव' –अब्राह्मणी स्त्रीवादाच्या चर्चाविश्वाच्या कंगोऱ्यातून एक चिंतन''
डॉ.गीतांजली भी.बोराडे ९३

३५. राजर्षि शाहू आणि भारतीय प्रश्न
प्रा.डॉ.मंजुश्री जयसिंगराव पवार ९७

३६. १८५७ सातारा परिसरातील हत्यारे, शस्त्रास्त्रे सरकार जमा करण्यासंबधीची अप्रकाशित कागदपत्रे
डॉ.चंद्रकांत जगन्नाथ अभंग ९९

३७. ना.गोपाळ कृष्ण गोखले : व्यक्ति व संस्थापन भारत सेवक समाज
प्रा.श्रुती राजेंद्र भातखंडे १०५

३८. कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीस 'प्रभात फिल्म कंपनी'चे योगदान
प्रा.डॉ.कविता अशोक गगराणी ११०

३९. धरण आणि भुकंप यांचा परस्पर संबंध आहे काय? विशेष अभ्यास कोयना जलविद्युत प्रकल्प
प्रा.डॉ.विश्वनाथ पांडुरंग पवार
सौ.सुषमा देवानंद पवार ११०

४०. क्रांतिसिंह नाना पाटील आणि १९६२ चे भारत चीन युध्द
प्रा.डॉ.सुमित संभाजी यादव ११७

४१. गुरव स्त्रियांचे गावगाड्यातील स्थान
डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे पाचपिंडे ११९

४२. कोहिनूर हिऱ्याचा इतिहास
डॉ.मधुकर विठोबा जाधव १२१

४३. प्रा.डॉ.एन.डी.पाटील रयतचे आधारवड
श्री.चंद्रकांत बाबूराव कुंभार १२५

४४. महात्मा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टिकोन
श्री.राजू जगन्नाथ लोखंडे १२७

४५. पुण्यातील शिवस्मारक आणि तत्कालीन वैचारिक संघर्ष
डॉ.सोपान शेंडे १२९

४६. घिसाडी जमात–स्थानिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून
प्रा.रमेश सोनू झरेकर १३३

४७. भारतीय चित्रपटसृष्टीतील महाराष्ट्र फिल्म कंपनीचे योगदान.
प्रा.हमीद उमरअली काझी १३६

# ४०. क्रांतिसिंह नाना पाटील आणि १९६२ चे भारत चीन युध्द

प्रा.डॉ.सुमित संभाजी यादव
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण.

**प्रस्तावना :** क्रांतिसिंह नाना पाटील जीवनभर समाजकारण व राजकारणात अग्रेसर होते. त्यांनी आपल्या जीवनात उच्च नीतीमूल्ये बाळगली होती.त्यात कधीही तडजोड केली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात गोरगरीब जनतेचे कल्याणासाठी ते भारतीय कम्युनिस्ट पार्टीत दाखल झाले होते. भारतीय कम्युनिस्ट पार्टीची विचारधारा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट विचारांशी मिळतीजुळती अशीच होती. जेव्हा स्वतंत्र भारतावर कम्युनिस्ट विचारधारेच्या चीनने १९६२ मध्ये आक्रमण केले तेव्हा सर्वच भारतीय कम्युनिस्टांना गोंधळ उडालेला होता. अशा या वैचारिक गोंधळाच्या परिस्थितीतही क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ठाम राष्ट्रवादी भूमिका घेवून आपले वेगळेपण दाखवून दिले होते. त्यांच्या या १९६२ च्या युध्दातील भूमिकेवर प्रकाश टाकण्याचे काम प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेले आहे.

**क्रांतिसिंहाचा भारतीय कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील जेष्ठ नेते व सातारा प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या राजकीय जीवनातील सन १९४७ ते १९५३ हा सुमारे पाच वर्षाचा काळ गोंधळाचा होता. या काळात काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष व कामगार किसान पक्षात त्यांनी कार्य केलेले होते. तरीही सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे हित या आपल्या अंतिम ध्येयापासून ते कधीही विचलित झाले नाहीत. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीच्या सर्वच पक्षांचा दारूण पराभव केल्यामुळे कष्टकरी चळवळीला ओहोटी लागलेली होती.[१] महाराष्ट्रातील काँग्रेसविरोधी गटातील बहुजन समाजाचे अनेक नेते काँग्रेसमध्ये परत जात होते. त्यांना तेथे मानाची पदे मिळत होती.

परंतु श्रमिकांचे राज्य आणण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे क्रांतिसिंह परत काँग्रेसमध्ये गेले नाहीत. तसेच त्यांना नवीन मार्गही सापडत नव्हता. अशा या द्विधा परिस्थितीवेळीच १९५२ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जाहीर निवेदन काढून देशातील क्रांतिकारकांना लोकशाही क्रांती पुढे नेण्यासाठी आपल्या पक्षात येण्याचे आवाहन केले.[२] त्यानुसार देशातील अनेक लोकांप्रमाणे मुंबईतील लाखो गिरणी कामगार तसेच साताऱ्यातील बाबुराव जगताप, माधवराव गायकवाड, शेख काका इ.लोक कम्युनिस्ट पक्षात गेले होते. लिंब, ता.जि.सातारा येथील बाबुराव जगताप हे मुंबईतील कामगारांचे पुढारी होते. क्रांतिसिंहांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या प्रयत्नाने नानांनी १९५३ मध्ये नाशिक जिल्ह्यातील रानवट येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदेत कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश केला.[३]

**कम्युनिस्ट पार्टीतील प्रारंभीचे कार्य :** भारतीय कम्यनिस्ट पार्टीची स्वातंत्र्यचळवळीतील चुकीच्या भूमिकेमुळे कम्युनिस्टांविषयी जनतेत अप्रियता होती. क्रांतिसिंहासारखा भक्कम जनाधार असलेला नेता पक्षात आल्यामुळे महाराष्ट्रातील कम्युनिस्टांना उर्जित अवस्था प्राप्त झाली होती. त्यांची शेतकऱ्यांविषयीची तळमळ पाहून पक्षाने त्यांना 'महाराष्ट्र किसान सभेचे' अध्यक्ष म्हणून नियुक्त केले.[४] नानांच्या नेतृत्वाखाली फलटण येथील खंडकरी शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यासाठी लढा देवून त्यांना न्याय मिळवून दिला. तसेच शेतीला हमीभाव मिळावा, धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन व्हावे. यासाठी त्यांनी महाराष्ट्र सरकारविरोधात आंदोलने केली. नानांच्या कार्याची दखल घेवून कम्युनिस्ट पक्षाने त्यांची डिसेंबर १९४५ला 'अखिल भारतीय किसान सभेचे' उपाध्यक्ष म्हणून निवड केली. सहा महिन्यानंतर लगेचच त्यांची 'अखिल भारतीय किसान सभेचे' अध्यक्ष म्हणून निवड झाली.[५] यानंतर त्यांनी देशातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी कार्य केले.

भारत सरकारच्या वतीने भारतीय शेतकऱ्यांचे प्रतिनिधी मंडळ ऑगस्ट/सप्टेंबर मध्ये सोव्हियत रशियाच्या भेटीवर गेले होते त्याचे नेतृत्वही नाना पाटील यांनी केले होते.[६] या दौऱ्यावरून परत आल्यानंतर महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र लढ्याला सुरूवात झाली होती. नानांनी आपले लक्ष्य या लढ्यात केंद्रित करून संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पुढील काळात पुन्हा आपले श्रमिकांच्या लढ्याचे कार्य सुरू केले. दरम्यानच्या काळात १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते सातारा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडूनही आले होते. तसेच १९६२ च्या निवडणूकित त्यांचा सातारा मतदारसंघातूनच पराभवही झाला.[७] तरीही ते एक कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कार्य करीतच राहिले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येवून महाराष्ट्रात कम्युनिस्ट विचारसरणी मूळ धरू लागली होती.

**१९६२ मधील चीनचे भारतावरील आक्रमण व नानांची भूमिका :** स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश राजवटीने या दोन राष्ट्रांच्या नैसर्गिकरित्या निश्चित झालेल्या सीमांचे 'मॅकमोहन रेषा' असे नामकरण केले होते. त्यावेळी दोन्ही राष्ट्रांनी त्या मान्यही केलेल्या होत्या. तरीही साम्राज्यवादी चीनने १९५९ पासून लडाख विभागातील भारतीय भूभाग व्यापण्यास सुरूवात केली. सीमाप्रश्नी तणाव वाढू लागला. भारताने तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांना राजकीय आश्रय दिला. त्यामुळे चीनने भारत आपल्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करत आहे असा आक्षेप घेतला. दोन्ही देशांचे संबंध खूपच बिघडले. अशाही परिस्थितीत तत्कालिन भारताचे पंतप्रधान पंडित नेहरूंनी दोन्ही राष्ट्रांचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तरीही नेहरूंच्या शांततावादी धोरणाला झुगारून चीनने ऑक्टोबर १९६२ मध्ये भारतावर अचानक आक्रमण केले.[८]

# ४०. क्रांतिसिंह नाना पाटील आणि १९६२ चे भारत चीन युध्द

प्रा. डॉ. सुमिन संभाजी यादव
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण.

**प्रस्तावना :** क्रांतिसिंह नाना पाटील जीवनभर समाजकारण व राजकारणात अग्रेसर होते. त्यांनी आपल्या जीवनात ज्या नीतीमूल्ये बाळगली होती.त्यात कधीही तडजोड केली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात गोरगरीब जनतेचे कल्याणासाठी ते भारतीय कम्युनिस्ट पार्टीत दाखल झाले होते भारतीय कम्युनिस्ट पार्टीची विचारधारा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट विचारांशी मिळती जुळती अशीच होती. तेव्हा स्वतंत्र भारताच्या कम्युनिस्ट विचारधारेच्या चीनने १९६२ मध्ये आक्रमण केले तेव्हा सर्वच भारतीय कम्युनिस्टांना गोंधळ उडालेला होता. अशा या वैचारिक गोंधळाच्या परिस्थितीतही क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ठाम राष्ट्रवादी भूमिका घेवून आपले वेगळेपण दाखवून दिले होते. त्यांच्या या १९६२ च्या युध्दातील भूमिकेवर प्रकाश टाकण्याचे काम प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेले आहे.

**क्रांतिसिंहाचा भारतीय कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील जेष्ठ नेते व सातारा प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या राजकीय जीवनातील सन १९४७ ते १९५३ हा सुमारे पाच वर्षाचा काळ गोंधळाचा होता. या काळात काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष व कामगार किसान पक्षात त्यांनी कार्य केलेले होते. तरीही सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे हित या आपल्या अंतिम ध्येयापासून ते कधीही विचलित झाले नाहीत. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीच्या सर्वच पक्षांचा दारूण पराभव केल्यामुळे कष्टकरी चळवळीला ओहोटी लागलेली होती.[१] महाराष्ट्रातील काँग्रेसविरोधी गटातील बहुजन समाजाचे अनेक नेते काँग्रेसमध्ये परत जात होते. त्यांना तेथे मानाची पदे मिळत होती.

परंतु श्रमिकांचे राज्य आणण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे क्रांतिसिंह परत काँग्रेसमध्ये गेले नाहीत. तसेच त्यांना नवीन मार्गही सापडत नव्हता. अशा या द्विधा परिस्थितीवेळीच १९५२ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जाहीर निवेदन काढून देशातील क्रांतिकारकांना लोकशाही क्रांती पुढे नेण्यासाठी आपल्या पक्षात येण्याचे आवाहन केले.[२] त्यानुसार देशातील अनेक लोकांप्रमाणे मुंबईतील लाखो गिरणी कामगार तसेच साताऱ्यातील बाबुराव जगताप, माधवराव गायकवाड, शेख काका इ.लोक कम्युनिस्ट पक्षात गेले होते. लिंब, ता.जि.सातारा येथील बाबुराव जगताप हे मुंबईतील कामगारांचे पुढारी होते. क्रांतिसिंहांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या प्रयत्नाने नानांनी १९५३ मध्ये नाशिक जिल्ह्यातील रानवट येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदेत कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश केला.[३]

**कम्युनिस्ट पार्टीतील प्रारंभीचे कार्य :** भारतीय कम्युनिस्ट पार्टीची स्वातंत्र्यचळवळीतील चुकीच्या भूमिकेमुळे कम्युनिस्टांविषयी जनतेत अप्रियता होती. क्रांतिसिंहासारखा भक्कम जनाधार असलेला नेता पक्षात आल्यामुळे महाराष्ट्रातील कम्युनिस्टांना उर्जित अवस्था प्राप्त झाली होती. त्यांची शेतकऱ्यांविषयीची तळमळ पाहून पक्षाने त्यांना 'महाराष्ट्र किसान सभेचे' अध्यक्ष म्हणून नियुक्त केले.[४] नानांच्या नेतृत्त्वाखाली फलटण येथील खंडकरी शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यासाठी लढा देवून त्यांना न्याय मिळवून दिला. तसेच शेतीला हमीभाव मिळावा, धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन व्हावे. यासाठी त्यांनी महाराष्ट्र सरकारविरोधात आंदोलने केली. नानांच्या कार्याची दखल घेवून कम्युनिस्ट पक्षाने त्यांची डिसेंबर १९४५ला 'अखिल भारतीय किसान सभेचे' उपाध्यक्ष म्हणून निवड केली. सहा महिन्यानंतर लगेचच त्यांची 'अखिल भारतीय किसान सभेचे' अध्यक्ष म्हणून निवड झाली.[५] यानंतर त्यांनी देशातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी कार्य केले.

भारत सरकारच्या वतीने भारतीय शेतकऱ्यांचे प्रतिनिधी मंडळ ऑगस्ट/सप्टेंबर मध्ये सोव्हियत रशियाच्या भेटीवर गेले होते त्याचे नेतृत्वही नाना पाटील यांनी केले होते.[६] या दौऱ्यावरून परत आल्यानंतर महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र लढ्याला सुरूवात झाली होती. नानांनी आपले लक्ष्य या लढ्यात केंद्रित करून संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पुढील काळात पुन्हा आपले श्रमिकांच्या लढ्याचे कार्य सुरू केले. दरम्यानच्या काळात १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते सातारा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडूनही आले होते. तसेच १९६२ च्या निवडणूकित त्यांचा सातारा मतदारसंघातूनच पराभवही झाला.[७] तरीही ते एक कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कार्य करीतच राहिले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येवून महाराष्ट्रात कम्युनिस्ट विचारसरणी मूळ धरू लागली होती.

**१९६२ मधील चीनचे भारतावरील आक्रमण व नानांची भूमिका :** स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश राजवटीने या दोन राष्ट्रांच्या नैसर्गिकरित्या निश्चित झालेल्या सीमांचे 'मॅकमोहन रेषा' असे नामकरण केले होते. त्यावेळी दोन्ही राष्ट्रांनी त्या मान्यही केलेल्या होत्या. तरीही साम्राज्यवादी चीनने १९५९ पासून लडाख विभागातील भारतीय भूभाग व्यापण्यास सुरूवात केली. सीमाप्रश्नी तणाव वाढू लागला. भारताने तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांना राजकीय आश्रय दिला. त्यामुळे चीनने भारत आपल्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करत आहे असा आक्षेप घेतला. दोन्ही देशांचे संबंध खूपच बिघडले. अशाही परिस्थितीत तत्कालिन भारताचे पंतप्रधान पंडित नेहरूंनी दोन्ही राष्ट्रांचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तरीही नेहरूंच्या शांततावादी धोरणाला झुगारून चीनने ऑक्टोबर १९६२ मध्ये भारतावर अचानक आक्रमण केले.[८]

चीनचे आक्रमण ही आंतरराष्ट्रीय कम्युनिस्टांचीच चाल आहे आणि भारतीय कम्युनिस्टही चीनवादीच आहेत अशी चर्चा देशभर होवू लागली
चीनच्या या अनपेक्षित आक्रमणामुळे देशातील कम्युनिस्ट नेतृत्त्वही हादरले होते. या प्रश्नावर नेमकी काय भूमिका घ्यावी? यावर चर्चा करण्यासाठी
कम्युनिस्ट पक्षाच्या नॅशनल कौन्सिलची बैठक झाली. परंतू आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट पक्षाच्या प्रभावाखाली येवून मॅकमोहन सीमारेषेचे अस्तित्व
अमान्य करून, चीनच्या आक्रमणाबाबत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. तसेच पुढील विजयवाडा व कलकत्ता
येथीलही बैठका कोणत्याही निर्णयाविनाच संपल्या. त्यामुळे भारतात कम्युनिस्टांबद्दल अनेक शंका निर्माण होवू लागल्या होत्या.[९]

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या या चुकीच्या धोरणामुळे महाराष्ट्रातही कम्युनिस्टांच्या लोकप्रियतेत घट झाली होती. क्रांतिसिंह हे महाराष्ट्रातील एक
प्रमुख कम्युनिस्ट नेते होते. परंतू त्याचबरोबर ते एक स्वातंत्र्यवीरही व सच्चे देशभक्तही होते. जरी ते विचाराने कम्युनिस्ट झालेले असले तरी त्यांच्या
सर्वोच्च निष्ठा देशाप्रतीच राहिलेल्या होत्या. यामुळे देशावरील या आक्रमणाबाबत पक्षाने घेतलेली भूमिका व पक्षनिष्ठा यांना बाजूला ठेवून कोणत्याही
परिणामाची तमा न बाळगता नानांनी सर्वप्रथम या चीनच्या आक्रमणाचा जाहीर निषेध केला. तसेच आपली सर्व ताकद पणाला लावून भारतीय
कम्युनिस्ट पार्टीला आपल्या धोरणात बदल करण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न सुरू केले. याकामी त्यांना कॉ.कमल भागवत, कॉ.ए.बी.वर्धन, कॉ.डांगे,
कॉ.बाबूराव जगताप, कॉ.माधवराव गायकवाड इ.नी सहकार्य केले.[१०]

मुंबई येथे या चीनी आक्रमणाबाबत कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कौन्सिलची बैठक झाली. या बैठकीत नानांनी चीनच्या आक्रमणाचा
कडक शब्दात निषेध केला. तसेच भारताच्या चीनविषयीच्या भूमिकेचे समर्थन करून पंडित नेहरूंच्या शांततेच्या परराष्ट्र नीतीचेही कौतुक केले. सर्व
देशवासियांनी एकत्रितपणे या आक्रमणाचा प्रतिकार करावा असे आवाहनही केले. प्रांतिक कौन्सिलतर्फे चीनच्या आक्रमणाचा धिक्कार करणारा
ठरावही पास करवून घेतला. तसेच जाहीर सभा घेवून या आक्रमणाविरूध्द जनमत संघटित करण्याचे कार्य त्यांनी केले.[११] अशा प्रकारे चीनच्या
आक्रमणावेळी पक्षाच्या आदेशाशिवाय नानांनी चीनचा जाहीर निषेध करून आपली राष्ट्रीय वृत्ती दाखवून दिली होती.

**समारोप :** क्रांतिसिंह नाना पाटील हे भारतीय कम्युनिस्ट पक्षात गेल्यामुळे त्यांच्यावर खूप टीका झाली होती. कारण १९४२ चा लढा व १९६२
चे चीनचे आक्रमण यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने घेतलेल्या चुकीच्या भूमिकेमुळे कम्युनिस्ट पक्षाविषयी भारतीय जनतेत संशयाचे वातावरण
निर्माण झालेले होते. गोरगरीब श्रमिक जनतेचे राज्य आणण्यासाठी कम्युनिस्ट मार्ग योग्य वाटल्यामुळे नाना पाटील या पक्षात आले होते. परंतु या
पक्षात राहूनही त्यांनी आपले वेगळे अस्तित्व टिकविले होते. चीनच्या आक्रमणाविषयी पक्षादेश नसतानाही जाहीर भूमिका घेवून कम्युनिस्ट पक्षाच्या
महाराष्ट्र प्रांतिक कौन्सिलतर्फे चीनच्या आक्रमणाचा निषेध करणारा ठराव पास करवून घेवून कम्युनिस्ट पक्षाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्याकामी
क्रांतिसिंह नाना पाटील यांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येते.

**संदर्भः**


१ मुलाखत : प्रा.डॉ.गुरव बाबुराव, दि.१६/११/२०११.
२. मुलाखत : कॉ.माने किरण, दि.०६/०१/२०१२.
३. भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी, १९७७, पृष्ठ २२.
४. शिवणीकर राघव, सातारचा सिंह क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, एस.एम. अधाटे पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट १९८६, पृष्ठ २५५.
५. भागवत कमल, उपरोक्त, पृष्ठ २४.
६. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मॉस्कोहून आपल्या घरच्यांना पाठविलेले दि.०७/०९/१९५५ चे पत्र.
७. मुलाखत : श्री.लाड जी.डी., दि.२३/१०/२०१०.
८. दै.मराठा, दि.३१/१०/१९६२.
९. मुलाखत : डॉ.पाटणकर भारत, दि.१३/०९/२०११
१०. पवार जयसिंगराव भाऊसाहेब(संपा.), क्रांतिसिंह नाना पाटील(खंड एक व दोन एकत्रित),रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, नवी सुधारित आवृत्ती, २००३, लेख भारतातील पहिला मार्क्सवादी शेतकरी नेता, लेखक प्रा.बा.ह.कल्याणकर, पृष्ठ१९४.
११. दै.मराठा, दि.१२/०८/१९५९.